नि.फौ.ख.क्र. ४७/२०२४
सरकार वि. दिपक
नि.क्र.०७ च्या खाली

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–पो.हे.हरिदास देविदास चाचरकर,
वय ४० वर्ष, व्यवसाय– ए.हे.कॉन्स्टेबल.
राह. पोलिस स्टेशन कुही.तह.कुही जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री. जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. दिनांक ०४/०२/२०२४ रोजी मी पो.स्टे.कुही येथे कार्यरत होतो. त्यावेळी अवैध धंद्यावर कारवाई करण्याकरिता असलेल्या पथकामध्ये मी कार्यरत होतो. दि.०४/०२/२०२४ रोजी पेट्रोलिंग करित असतांना पो.स्टे.बेला अंतर्गत नांद ते सिर्सी रोड येथे रेतिची अवैध वाहतुक होत आहे अशी माहिती मिळाल्याने तेथे नाकाबंदी केली. त्यावेळी तेथे रेती भरलेला ट्रक नाकाबंदीमध्ये मिळून आला. सदर ट्रकचा नंबर एम.एच.४० सि.यु.७३३३ असा होता. त्यानंतर सदर ट्रकचालकाला थांबवुन त्याला रॉयल्टीबाबात विचारणा केली असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी दोन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर सदर ट्रकचालक, रेती भरलेला ट्रक यांना घेउन पो.स्टे. बेला येथे आलो. सदर ट्रकमध्ये १० ब्रास रेती होती. त्यानंतर कायदेशीर फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **नि.क्र.०८** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे त्यास **नि.क्र.०९** देण्यात आला. ज्या आरोपींनी रेतीची चोरी केली होती त्याना पाहिल्यास मी ओळखतो ते न्यायालयात हजर आहेत, ते तेच आहेत त्यांनीच रेतीची चोरी केली होती. आता मला समन्सपत्र दाखविण्यात आले त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी व दोन पंचांच्या सह्या आहे त्यास **नि.क्र.१०** देण्यात आला. त्यानंतर मी घटनास्थळावर जाउन घटनास्थळ जप्तीपंचनामा तयार केला. आता मला घटनास्थळ जप्तीपंचनामा दाखविण्यात आला त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी, दोन पंचांच्या व दोन अरोपींच्या सह्या सह्या आहेत सदर घटनास्थळ जप्तीपंचनाम्यास **नि.क्र.११** देण्यात आला. आता मला फोटो दाखविण्यात आले. सदर फोटो घटनास्थळाचे आहे त्यास **आर्टीकल अ** देण्यात आला. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते.

**सरतपास संपला.**

**<u>आरोपीतर्फे ॲड. श्री.सलिम शेख यांच्यातर्फे उलटतपास सुरू.</u>**

२. आमच्या वरिष्ठांनी ज्या आदेशाने पथक तयार केले होते त्या आदेशाची प्रत मी तपासी अंमलदार यांना दिली नाही तसेच अभिलेखावरसुध्दा असल्याचे दिसुन येत नाही. सिर्सी क्षेत्र हे बेला पो.स्टे. च्या क्षेत्रात येते. मी घटनास्थळावर कारवाई करण्यापुर्वी तशी नोंद बेला पो.स्टे.च्या हलचल रजिस्टरला केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की,आम्ही सरतपासात सांगितलेला रेति वाहतुक करणारा ट्रक जप्त केला नाही. मी फिर्याद लेखी दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना हजर राहण्याकामी समन्सपत्र दिले नव्हते व त्याच्यासमक्ष घटनास्थळ जप्तीपंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगिण्यावरून आरोपीविरूध्द खोटी कारवाई केली. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ वरिल फोटो खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की,वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १८.०९.२०२४

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड